'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

# उत्तम बंडू तुपे यांच्या 'खाई' कादंबरीतील स्त्री जीवन

प्रा. डॉ. अन्नपुर्णा अजाबराव चौधरी
श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय,
पांढरकवडा
Mobile No. 9403742369
E-mail - annapurnachaudhari@gmail.com

*उत्तम बंडू तुपे हे दलित साहित्यामध्ये मोलची भर घालणारे लेखक आहे. कथा, कादंबरी, आत्मकथा लिहून त्यांनी मराठी साहित्याला महत्वाचे योगदान दिले. तुपे यांनी सामाजिक विषय घेऊन साहित्य लेखन केले आहे. सामाजिक जाणीव हेच त्यांच्या साहित्याचे प्राणतत्व आहे. ग्रामीण जीवन हे व्यथा, वेदनेने भरलेले आहे. वास्तव जीवनाची प्रांजळ अभिव्यक्ती तुपे यांच्या साहित्याचा विशेष म्हणता येईल. उत्तम बंडू तुपे यांनी 'खाई', 'खुळी', 'शेवंती' या कादंबऱ्या मधून स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या भोगवट्याचे दर्शन घडविलेले आहे. स्त्री समस्यांचे विविधांगी पदर त्यांच्या कादंबरीने उलगडून दाखवलेले आहे.*

## तुपे यांच्या 'खाई' कादंबरीतील स्त्री जीवन :–

उत्तम बंडू तुपे हे मराठी ग्रामीण व दलित जीवन अधोरेखित करणारे एक आघाडीचे व दर्जेदार कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. ग्रामीण जीवनासोबतच दलित, उपेक्षित जीवनाचे वेगवेगळे पदर त्यांनी 'झुलवा', 'खाई', 'खुळी', 'शेवंती', 'झावळ', 'भस्म', 'इजाळ', 'चिपाड', 'लांबलेल्या सावल्या' या कादंबरीमधून चितारलेली आहे. डॉ. सुरेश पैठनकर लिहितात, 'विषय, आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने अभिनव ठरावी असे या कादंबरीचे स्वरूप आहे तेव्हा तुपेंच्या कादंबरीला समजून घेण्यासाठी त्यांच्या कादंबरी लेखनाचे स्वरूप व जीवनानुभ समजून घेणे संयुक्तीक होईल''.

अण्णाभाऊ साठेंनी ज्या प्रमाणे आपल्या कादंबऱ्यातून दलित जीवन केंद्रस्थानी ठेवून कादंबरी लेखन केले तेच जीवन तुपेंनी देखिल अधोरेखित केले. साठेंच्या कादंबरीच्या संदर्भात योगेंद्र मेश्राम म्हणतात, ''आपल्या तळपत्या प्रतिभेने त्यांनी मराठी वाङ्‌मयात मोलाची नवी भर घातली. एका उपेक्षित जीवनाच्या अविष्काराने साहित्य क्षेत्रात अपूर्वता आणली त्यांनी मराठी साहित्याचा मळा संपन्न केला.''

अण्णाभाऊ साठे यांच्यानंतर असेच उपेक्षित ग्रामीण, दलित जीवन तुपेंच्या साहित्याने अधोरेखित केले. शंकरराव खरात, बाबूराव बागूल, नामदेव व्हटकर, हरिभाऊ पागारे या सारख्या अनेक लेखकांनी दलित उपेक्षित जीवन अधोरेखित केले. दलित व ग्रामीण वास्तवाचे चटके सहन करणारा लेखकच खऱ्यारूपात हे जीवन वास्तव साकार करू शकतो हे तुपे यांचे साहित्य वाचल्यानंतर वाटते. तुपेंची कादंबरी वास्तवाचे भान ठेवून उदयाला आलेली मराठी साहित्यातील कादंबरी आहे. आशय, विषय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने मराठी साहित्यात वेगळेपणाने शोभून दिसणारी कादंबरी तुपे यांनी लिहिलेली आहे.

उत्तम बंडू तुपे हे दलित साहित्यामध्ये मोलची भर घालणारे लेखक आहे. कथा, कादंबरी, आत्मकथा लिहून त्यांनी मराठी साहित्याला महत्वाचे योगदान दिले. तुपे यांनी सामाजिक विषय घेऊन साहित्य लेखन केले आहे. सामाजिक जाणीव हेच त्यांच्या साहित्याचे प्राणतत्व आहे. ग्रामीण जीवन हे व्यथा, वेदनेने भरलेले आहे. वास्तव जीवनाची प्रांजळ अभिव्यक्ती तुपे यांच्या साहित्याचा विशेष म्हणता येईल. उत्तम बंडू तुपे यांनी 'खाई',

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

'खुळी', 'शेवंती' या कादंबऱ्या मधून स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या भोगवट्याचे दर्शन घडविलेले आहे. स्त्री समस्यांचे विविधांगी पदर त्यांच्या कादंबरीने उलगडून दाखवलेले आहे.

पुरूषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये पुरूष स्त्रीला भोगवस्तू म्हणून पहात आलेला आहे. 'खाई' या कादंबरीची नायीका अशाच पुरूषप्रधान व्यवस्थेत भोगवस्तू म्हणून पुरूषी व्यवस्थेची बळी ठरते. या कादंबरीचे कथानक संपूर्ण ग्रामीण पार्श्वभूमी घेवून आलेले आहे. वासनांध असणारा सोमा हा सावरीचा सासरा वारंवार सावरीचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करतो. सावरी वारंवार स्वत:चा बचाव करते. परंतु या घटनेचे गावात वेगळेच पडसाद उमटते. संपूर्ण गाव सावरी व तिच्या कुटुंबाला बदनाम करते. त्यांची अवहेलना करते. सावरीच्या कुटुंबातील माणसे नवरा, सासू व सासरा सावरीला समजून घेत नाही. त्यामुळे निरपराध व साध्या भोळ्या सावरीच्या आयुष्याची वाताहत होते. गावात तोंड दाखवायला सावरीला जागा राहत नाही.

सावरी ही अल्पशिक्षित पण सुसंस्कृत घरातली मुलगी अतिशय सुस्वभावी, देखणी व कष्टाळू असते. सोमा हा आपल्याकडे शेतजमीन असल्याचे खोटे सांगून मुलगा विष्णू सोबत लग्न जमवून टाकतो. विष्णूचे शिक्षण पूर्ण झाले असे भासवतो. सावरी सून म्हणून घरात येते. सावरीला सासरा हा आपल्या जन्मदात्या बापाप्रमाणे वाटातो. परंतु त्याची वाईट नजर आपल्यावर आहे याची शंकाही सावरीच्या मनात येत नाही. सुरवातीला सासऱ्याच्या वाईट वागणूकीकडे ती दुर्लक्ष करते परंतु जेव्हा विष्णू हा मुंबईला नोकरी निमित्य जातो तेव्हा सावरी विष्णूला सासऱ्याच्या वाईट वृत्तीने वागण्याची कल्पना देते. सावरी त्याच्यासोबत जाण्याची इच्छाही व्यक्त करते परंतु मुंबईत राहण्यासाठी जागा नाही म्हणून विष्णू तिला सोबत नेण्याचे टाळतो. विष्णू मुंबईला निघून जातो. सावरी अंगणात झोपलेली असतांना सोमा तिच्यावर जबरदस्ती करतो. सुरवातीला ती त्याला लाथाडते व नंतर सासू व नंदेला जागविते. सासू व नणद दोघीही सावरीची समजूत घालतात. असफल सोमा व गावात अब्रू गेली म्हणून भामा सावरीचा छळ करतात. सावरी आत्महत्येचा विचार करते. परंतु सावरीची मैत्रीन रंगी तिची समजूत वाढते. नवऱ्याच्या माघारी असे करणे बरोबर नाही असे ती सावरीला सांगते. दसऱ्याच्या सणा निमित्य विष्णू गावी येतो. विष्णूच्या कानावर सावरी घडलेला प्रसंग सांगते. विष्णू बापाकडे रागाने रोखून बघतो. सावरीच्या बापालाही घडल्याप्रसंगाची माहिती मिळते तो सावरीला न्यायला येतो. परंतु सोमा विष्णूचे दुसरे लग्न लावण्याचा निर्धार बोलून दाखवतो व तो हतबल होवून निघून जातो. सावरीवर प्रेम असतांना विष्णू मुंबईला जाण्याची तयारी करतो. बापाचाही आधार तुटतो व विष्णू मुंबईला निघून गेल्यामुळे सावरी एकाकी होते. विष्णू तिला एवढेच सांगतो "सावरे, रडू नगस ...." वापरायची वस्तु ...... लोकांनीकाय नि बापानी काय एकच ...... त्यो कापून घेणार न्हाय ..... मुलाचे हे शब्द ऐकून सोमाला पश्चाताप होतो. आपल्या हातून अक्षम्य चूक झाली असे सोमाला वाटते. कारण तो सर्वाच्याच नजरेतून उतरतो. विष्णूची समजूत घालतांना तो म्हणतो "इष्णू, कुलस्वामी खंडेरायाची आण ... जा. निला .... दूर पण सुनबाईला अंतर देणार नाही" सोमाला पश्चाताप होतो व तो सुनेशी मुलीप्रमाणे वागतो परंतु गाव हे मान्य करायला तयार नसते. "सासऱ्या बरोबर.... हाय , ती हीच का ?" अशा शब्दात सावरीची चेष्टा होते. गरोदर सावरीला आराम मिळावा म्हणून सावरीचा बाप माहेरी घेवून येतो. परंतु माहेरी सावरीच्या सावत्र आईला तिची अडचण होते. माहेरी सावत्र आईचा जाच होतो. तिच्या मनाचा कोंडमारा होतो. गरोदरपणातही सावरी अविश्रांतपणे कष्ट करते. एक दिवस सावरी भुईमुगाच्या सुगीला शेतावर जाते व तिथेच तिचे बाळंतपण होते. बाळंतपणात सारे सावरीची काळजी घेतात. एक दिवस सावरीची मुलगी तापाने अस्वस्थ होते. सासऱ्याची भिती मनात असूनही त्याच्यासोबत दवाखान्यात

जाते. रात्रीची वेळ असते. गावामध्ये वेगवेगळ्या चर्चेला उत येतो. ''सासरा सुनेला घेऊन पळाला'' अशी बोंब गावात होते. अशा बदनामीमुळे सोमा विष प्राशन करून आत्महत्या करतो. सोमाच्या आत्महत्येला सावरीला जबाबदार धरले जाते. विष्णू सावरीला बदडून काढतो.. सावरीचा काहीही दोष नसतो परंतु ती विष्णूच्या मनातून उतरते. मारहाण करून तो तिला घराबाहेर काढतो. ती त्याला गयावया करते. परंतु त्याला तीची दया येत नाही. तो क्रूरपणे सावरीशी वागतो. सावरी तडफडते. अशाही स्थितीत ती सासरी दिवस काढते. सावरीचा बापही साप चावून मरतो. माहेरचा आधारही तुटतो. विष्णूमध्ये बदल होईल ही वेडी आशा सावरीला असते त्या आशेवर ती कष्ट करून जगते परंतु सावरीवर भोंग्याच्या संत्याची वाईट नजर असते. तिकडे विष्णू मुंबईला खाणावळीत वैजयंताच्या नादी लागतो. एकदा तिला निलाच्या लग्नात गावी घेऊन येतो. सावरीला निलाच्या लग्नाचे निमंत्रण नसते. परंतु नंदेने आपल्यासाठी खूप सहन केल्याची जाणीव ठेवून सावरी निलावर अक्षता टाकण्यासाठी जाते. संत्या सावरीला मागणी घालतो परंतु सावरी साफ नाकारते. विष्णूने गावाचा अपमान केला म्हणून गाव बिथरते. सावरी आपल्या नवऱ्याला वाचवण्यासाठी धडपडते. संत्या साथीदारासोबत सावरीला उचलून नेतो व आळीपाळीने तिच्यावर बलात्कार करतो. सावरी नवऱ्यासाठी नानाप्रकारच्या यातना सहन करते. सत्शील असणारी सावरी आपले चारित्र्य सांभाळण्यासाठी धडपडते परंतु तिचा नाइलाज होतो. या कादंबरीच्या माध्यमातून तुपे यांनी पुरूषांच्या भोगविलासीवृत्तीमुळे एखाद्या निरपराध स्त्री चा कसा बळी जातो हे सावरी या पात्राच्या माध्यमातून स्पष्ट केलेले आहे.

**<u>सारांश</u> :**

या कादंबरीतील सावरी स्वत:चे चारित्र्य सांभाळते परंतु चहोबाजूनी दुर्बल झालेल्या सावरीच्या वाट्याला अतिप्रसंग येतो. त्याचा सामना तिला करावा लागतो. स्त्री ही भोगाची वस्तू आहे हे वास्तव 'खाई' या कादंबरीतून लेखकाने अधोरेखीत केले. स्त्री दु:खाचे नाना पदर या कादंबरीतून तुपे यांनी स्पष्ट केले. पुरूषप्रधान व्यवस्था एखाद्या निरपराध अबला असणाऱ्या स्त्रीचा कसा गैरवापर करते हे या कादंबरीने अधोरेखीत केले. गावागावातील अशा कितीतरी निरपराध स्त्रिया अशा प्रकारच्या पुरूषी वासनेच्या बळी ठरत असतील ही जाणीव कादंबरी वाचून होते. सावरी ही व्यक्तीरेखा एकटी न राहता ती स्त्रियांचे प्रातिनिधीक रूप घेऊन पुढे येते. स्त्रियांच्या जाचाचे वेगवेगळे पदर या कादंबरीने टिपलेले आहे. घराचे घरपण टिकवण्यासाठी अहोरात्र धडपडणाऱ्या स्त्रीला शेवटी बेघर व्हावे लागते व जन्मभर दु:खाच्या खाईत जीवन जगावे लागते. सावरीचा काहीही दोष नसतांना सर्व गोष्टीला सावरीला जबाबदार धरले जाते. सावरीला चांगल्या वाईट गोष्टीसाठी जबाबदार धरून तिचे आयुष्य नासवून टाकले जाते. साऱ्यांच पुरूषांच्या वासनांध नजरेला तिला सतत सामना करावा लागतो. उत्तम बंडू तुपे यांची ''खाई' ही कादंबरी एका निरपराध स्त्रीच्या उद्ध्वस्त जीवनाची करून कहानी आहे. पतीनिष्ठ असणाऱ्या स्त्रीवर होणारे अन्याय व तिला करावा लागणारा संघर्ष वाचकाला अस्वस्थ केल्या शिवाय राहात नाही.

**संदर्भ :—**

१. उत्तम बंडू तुपे — ''खाई' — मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई पहिली आवृत्ती १९८८
२. डॉ. सुरेश पैठणकर — उत्तम बंडू तुपे यांचे साहित्य आस्वाद आणि समीक्षा — कैलास पब्लीकेशन औरंगाबाद
३. डॉ. योगेंद्र मेश्राम — दलित साहित्य : उद्गम आणि विकास मंगेश प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती १९९८
४. डॉ. किशोर सानप — मराठी कादंबरीतील नैतिकता बजाज पब्लीकेशन अमरावती